(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**२०२३ एस. सी. सी. ऑनलाईन एस. सी. ४७७**

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

**(न्यायमूर्ती अजय रस्तोगी आणि न्यायमूर्ती  बेला एम. त्रिवेदी, यांच्या समक्ष)**

**अनूप बरतारिया आणि इतर.** **याचिकाकर्ते;**

**विरुद्ध**

**उपसंचालक, अंमलबजावणी संचालनालय आणि इतर** **उत्तरार्थी.**

**विशेष अनुमती याचिका (फौ.) क्रमांक २३९७-२३९८/ २०१९**

**२१ एप्रिल २०२३ रोजी अधिनिर्णित**

या प्रकरणात उपस्थित राहिलेले वकीलःश्री. स्वदीप होरा, अधिवक्ता (व्ही. सी.);
श्री. महेश अग्रवाल,
ॲड. श्री. अंकुर सैगल,
ॲड. श्री. अंशुमन श्रीवास्तव,
ॲड.श्री. अनिरुद्ध भाटिया,
ॲड. श्री. शुभम कुलश्रेष्ठ, अभिलेख अधिवक्ता (AOR) - याचिकाकर्त्यांसाठी
श्री. ई. सी. अग्रवाल,
ॲड. श्री. जोहेब हुसेन,
ॲड. श्री. कानू अग्रवाल,
ॲड. श्री. अर्काज कुमार,
ॲड. श्री. पद्मेश मिश्रा,
ॲड. श्री. अन्नम वेंकटेश,
ॲड.  श्री. शबरीश
ॲड. कु. श्रद्धा देशमुख,
श्री. मुकेश कुमार मारोरिया, अभिलेख अधिवक्ता (AOR) - प्रतिवादींसाठी

**न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांनी न्यायनिर्णय दिला.**

याचिकाकर्त्यांनी या याचिकांच्या माध्यमातून राजस्थान उच्च न्यायालय, यांच्या जयपूर खंडपीठाने एस. बी.(S.B.) फौजदारी रिट याचिका क्रमांक ७०४/२०१८ आणि एस. बी. (S.B.) फौजदारी रिट याचिका क्रमांक ७५७/२०१८ मध्ये दिनांक २१/०२/२०१९ रोजी दिलेल्या समान निर्णय आणि आदेशाला आव्हान दिले आहे, ज्या उच्च न्यायालयाने 50,000/- एवढा दंड आकारून दोन्ही याचिका फेटाळून लावल्या होत्या.

२. याचिकाकर्ते अनूप बरतारिया, संचालक, वर्ल्ड ट्रेड पार्क लिमिटेड यांनी एस. बी. फौजदारी रिट याचिका क्रमांक १०४/२०१८ दाखल करून त्या द्वारे अंमलबजावणी संचालनालयाच्या जयपूर क्षेत्रीय कार्यालयाने दाखल केलेले ECIR No. JPZO/०१/२०१६ रद्दबातल करण्याची प्रार्थना केली असून प्रतिवादींनी याचिकाकर्त्याविरुद्ध कोणतीही फौजदारी तक्रार दाखल करू नये आणि याचिकाकर्त्याविरुद्ध उक्त ई. सी. आय. आर. च्या संदर्भात कोणतीही दंडात्मक पावले उचलू नयेत अशी विनंती केली. एस. बी. फौजदारी रिट याचिका क्रमांक 757/2018 ही याचिकाकर्ते- अनूप बारतारिया, संचालक, वर्ल्ड ट्रेड पार्क लिमिटेड आणि कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत मेसर्स वर्ल्ड ट्रेड पार्क लिमिटेड या कंपनीने दाखल केली होती, ज्याद्वारे ECIR No. JPZO/०१/२०१६ मधील फिर्यादीची अभियोग तक्रार रद्दबातल करण्यासाठी आणि बाजूला सारण्यासाठीची प्रार्थना केली आहे.

३. याचिकाकर्त्यांच्या प्रकरणानुसार, याचिकाकर्ते-अनूप बर्तारिया हे एक अग्रगण्य आणि सन्मानित अभियंता/वास्तुविशारद आहेत, ज्यांना संरचनात्मक, वास्तू

आणि रचना सल्लामसलत सेवा प्रदान करण्यात कौशल्य आहे आणि ते वर्ल्ड ट्रेड पार्क लिमिटेड (पूर्वीचे मेसर्स आर. एफ. प्रॉपर्टीज अँड ट्रेड लिमिटेड) चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक देखील आहेत, जी कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी आहे. वर्ल्ड ट्रेड पार्क हे जे. एल. एन. मार्ग (JLN MARG), जयपूर स्थित सर्वाधिक मागणी असलेल्या स्थावर व्यावसायिक मालमत्तांपैकी एक आहे.वर्ल्ड ट्रेड पार्क कंपनी विविध इच्छुक ग्राहक/खरेदीदारांना व्यावसायिक जागा विकण्याच्या आणि भाड्याने देण्याचा व्यवसाय करणारी कंपनी आहे.

४. श्री. भारत बंब आणि त्याच्या सहकाऱ्यांनी याचिकाकर्त्यांशी संपर्क साधून या वर्ल्ड ट्रेड पार्कमधील व्यावसायिक पेढीच्या खरेदीसाठी संपर्क साधला आणि काही व्यावसायिक गाळे नोंदविले. सुरुवातीला, भारत बंब यांनी राज दरबार मटेरियल ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या नावाने काही व्यावसायिक गाळ्यांची नोंद केली होती आणि त्यांची एकूण रक्कम रु. ७४.०२ कोटी रुपये याचिकाकर्त्यांना धनाकर्ष (D.D.) आणि/किंवा आरटीजीएस (RTGS) द्वारे देण्यात आले. त्यानंतर दयपूर स्थित एका स्थावर मालमत्ता प्रकल्पासाठी स्थापत्य रचना आणि सल्लामसलत सेवांसाठी याचिकाकर्ते-अनूप बरतारिया यांना भारत बंब यांच्याकडून १ कोटी ४० लाख रुपये प्राप्त झाले होते. तथापि, त्यानंतर श्री. बंब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी याचिकाकर्त्यांना नवीन संस्थांच्या नावाने व्यावसायिक नोंदणी करण्यास सांगितले आणि त्यामुळे याचिकाकर्त्यांनी मेसर्स राज दरबार मटेरियल ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेडने जमा केलेली रक्कम परत केली. त्यानंतर २०१५ मध्ये, याचिकाकर्त्यांनी ३४ व्यावसायिक पेढ्या श्री भरत आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या नावे ३४ नोंदणीकृत विक्री करारनामा करून विकल्या. याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, रक्कम

डिमांड ड्राफ्ट(DD) आणि/किंवा आरटीजीएस (RTGS)द्वारे प्राप्त झाली होती आणि नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या सर्व कायदेशीर औपचारिकता देखील योग्य वेळी पाळल्या गेल्या.श्री. बंब यांच्या सूचनेनुसार या पेढ्यांचा ताबा देखील संबंधित संस्था/व्यक्तींकडे सोपवण्यात आला होता .

५. याचिकाकर्त्यांनी आय. डी. बी. आय.(IDBI ) बँक आणि डी. एच. एफ. एल.(DHFL) तसेच यूको (UCO) बँकेकडून कर्ज/आर्थिक सहाय्य घेतले होते आणि त्यासाठी वर्ल्ड ट्रेड पार्कचे युनिट/जागा या बँकांकडे गहाण ठेवल्या होत्या. ०४/१०/२०१४ रोजी, याचिकाकर्त्यांनी २३८३७ चौरस फूट एवढी एक विशिष्ठ स्थावर मालमत्ता सोडण्यासाठी UCO बँकेकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले होते आणि २३/१२/२०१४ रोजी आयडीबीआय (IDBI ) बँक, जयपूर कडून अनुपालनातील नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून विशिष्ठ पेढ्यांच्या हस्तांतरणासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले होते. त्याचप्रमाणे, डी. एच. एफ. एल.,(DHFL) मुंबईने ११,५३८ चौरस फूट क्षेत्रफळाच्या व्यावसायिक पेढ्यांच्या हस्तांतरणासाठी ना हरकत (NOC ) प्रमाणपत्र दिनांक २४/०३/२०१५ रोजी जारी केली होती.

६. याचिकाकर्त्यांच्या पुढील प्रकरणानुसार, याचिकाकर्ते-अनूप बरतारिया यांनी वर्ल्ड ट्रेड पार्कमध्ये त्यांच्या वैयक्तिक क्षमतेनुसार तीन कार्यालये, अनुक्रमे ४०७, ४०८ आणि ४०९ खरेदी केले होते आणि सदर खरेदीपोटी त्याच्या चालू खात्यातून रक्कम भरली होती ज्या खात्याचा श्री भारत बंब किंवा त्याच्या सहकाऱ्यांशी कोणताही संबंध नव्हता.

७. CBI, BS&FC, नवी दिल्ली यांनी ०७/०३/२०१६ रोजी प्रथम खबरी अहवाल क्रमांक RCBD१/२०१६/E/०००२ उक्त भारत बंब, त्याचे सहकारी आणि सिंडिकेट बँकेच्या तीन अधिकारी, ते म्हणजेः- (१) बापू बाजार, उदयपूर (२) मालवीय नगर, जयपूर आणि (३) एम. आय. रोड, जयपूर शाखांअधिकाऱ्यांविरुद्ध दाखल केली होती आणि अन्य व्यक्तींवर भारतीय दंड संहितेच्या १२०बी , ४२०,४६७,४६८,४७१,४७२ आणि ४७४ आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९९८ च्या कलम १३ (२) सह १३ (१) (डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सन २०११-२०१५ च्या दरम्यान आरोपी भारत बंब आणि त्याच्या सहकाऱ्यांनी सिंडिकेट बँकेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून त्याचे ग्राहक/कर्मचारी/कुटुंबातील सदस्य तसेच सिंडिकेट बँकेच्या विद्यमान ग्राहकांच्या केवायसी कागदपत्रांचा गैरवापर करून सुमारे १८,००० कोटींहून अधिक पैसा पांढरा करण्यात आला व त्यापैकी १०५५. ७९ कोटी रुपये काढून घेतले. १४.०६.२०१६ रोजी, CBI, BS&FC ने सदर गुन्ह्यांसाठी श्री भरत बंब आणि सिंडिकेट बँकेच्या काही अधिकाऱ्यांच्या विरोधात सीबीआय (CBI) न्यायालय, जयपूर यांच्या समक्ष आरोपपत्र दाखल केले.

८. सदर प्रथम खबरी अहवालामध्ये सीबीआय (CBI) ने नोंदवलेले काही गुन्हे हे धन- शोधन निवारण अधिनियम (पी. एम. एल. ए.), २००२ अंतर्गत अनुसूचित गुन्हे असल्याने, सक्त अंमलबजावणी संचालनालयाने (ED) जयपूरने ११/०७/२०१६ वर ‘सक्त अंमलबजावणी माहिती अहवाल’ (ECIR) नोंदवून पैशाच्या गैरव्यवहाराच्या गुन्ह्याचा तपास सुरू केला.

९. तपासादरम्यान, असे उघड झाले की याचिकाकर्ते अनूप बर्तारिया आणि त्यांच्या कंपन्या वर्ल्ड ट्रेड पार्क ली. आणि मे. सिन्सियर इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. यांना भारत

बंब चालवत असलेल्या काल्पनिक पेढ्या/कंपन्या म्हणजेच मे. बी.के. बिल्डर्स, मेसर्स राज दरबार मटेरियल ट्रेडिंग प्रा. लि., मेसर्स राज दरबार मटेरियल ट्रेडिंग एलएलपी, जय हनुमान कन्स्ट्रक्शन आणि मेसर्स ओम्प्रिया एंटरटेनमेंट अँड हॉस्पिटॅलिटी इत्यादींच्या खात्यांमधून १६० कोटींहून अधिक फसवणूक केलेला निधी प्राप्त झाला होता.

१०. त्यामुळे याचिकाकर्ते-अनूप बर्तारिया यांनी उच्च न्यायालयासमोर एस. बी.(SB) फौजदारी रिट याचिका क्रमांक ७०४/२०१८ ही रिट याचिका दाखल केली, ज्यात दिनांक ११/०७/२०१६ रोजीचा 'सक्त अंमलबजावणी माहिती अहवाल' (ECIR) रद्दबातल करण्याची प्रार्थना केली गेली.तथापि, सदर याचिका प्रलंबित असताना, १७/०७/२०१८ रोजी उक्त याचिकाकर्त्यांसह अनेक व्यक्तींविरुद्ध सदर ECIR (इ.सी.आई.आर) वर आधारित फिर्यादी तक्रार दाखल करण्यात आली.त्यामुळे याचिकाकर्त्यांनी एस. बी.(SB) फौजदारी रिट याचिका क्रमांक ७५७/२०१८ दाखल केली आणि फिर्यादीची तक्रार रद्द करण्याची विनंती केली. उच्च न्यायालयाने आक्षेपित आदेशाद्वारे दोन्ही रिट याचिका रु. ५०,०००/- च्या खर्चासह फेटाळण्यात आल्या.

११. याचिकाकर्त्यांच्या वतीने विद्वन वकील श्री. स्वदीप होरा यांनी मांडलेला युक्तिवाद हा आहे की, सिंडिकेट बँकेचे अधिकारी आणि श्री. भारत बंब यांच्या विरोधात केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) ने दाखल केलेल्या प्रथम खबरी अहवाल (FIR ) मध्येही याचिकाकर्त्यांचे नाव नव्हते तसेच सक्त अंमलबजावणी संचालनालयाने (E. D.) ने त्यानंतर नोंदवलेल्या ECIR मध्येही त्याचे नाव नव्हते, तथापि, तपासानंतर सक्त अंमलबजावणी संचालनालयाने (E. D.) ने उक्त ECIR मध्ये याचिकाकर्त्यांस खोटेपणाने समाविष्ट करून खटला दाखल केला आहे. त्यांच्या मते, पी. एम. एल. ए.(PMLA ) च्या

कलम ३ सह वाचन केलेल्या कलम ४ मध्ये परिभाषित केल्यानुसार धनशोधनाच्या (Money Laundering ) गुन्ह्यासाठी अनिवार्य आणि आवश्यक घटक म्हणजे ती व्यक्ती उक्त कायद्याच्या कलम २ (१) (यू) अंतर्गत परिभाषित केलेल्या गुन्ह्याच्या संबंधित कोणत्याही प्राप्तीबद्दल संबंधित किंवा कृत्यात जाणीवपूर्वक किंवा प्रत्यक्षात सहभागी असणे आवश्यक आहे आणि म्हणूनच, जोपर्यंत दखलविषयक ज्ञात असलेले आवश्यक घटक पूर्ण होत नाही तोपर्यंत प्रस्तुत कायद्यांतर्गत कोणतीही तक्रार किंवा कार्यवाही सुरू केली जाऊ शकत नाही. प्रस्तुत प्रकरणात, याचिकाकर्त्यांविरुद्ध तक्रार दाखल करण्यासाठीची पूर्वअट अनुपस्थित असल्यामुळे, कायद्याच्या नजरेत तक्रार समर्थनीय नव्हती आणि पी. एम. एल. ए.(PMLA) अंतर्गत याचिकाकर्त्यांविरुद्ध कोणतीही कारवाई सुरू ठेवणे हा कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर ठरेल.

१२. याचिकाकर्त्यांविरुद्ध केलेल्या आरोपांवर आपले म्हणणे सविस्तरपणे मांडताना, श्री. होरा यांनी सांगितले की याचिकाकर्त्यांचे श्री. भारत बंब आणि त्यांच्या सहकाऱ्यांशी केवळ "खरेदीदार-विक्रेता" एवढेच संबंध होते आणि याचिकाकर्त्यास मिळालेले पैसा हा गुन्हेगारीतून मिळालेले उत्पन्न आहे याची याचिकाकर्त्यांना कल्पना नव्हती. या संदर्भात श्री. होरा यांनी निकेश ताराचंद शाह विरुद्ध भारतीय संघराज्य या प्रकरणावर भर दिला आहे.त्यांनी पुढे सांगितले की जरी सुरुवातीला श्री. भारत बंब यांनी याचिकाकर्त्यांना मेसर्स राज दरबार मटेरियल ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या नावाने काही व्यावसायिक पेढ्या नोंदविण्याची करण्याची विनंती केली होती, त्यानंतर त्यांनी विविध संबंधित संस्थांच्या नावाने खरेदी खत निष्पादित करण्याची विनंती केली होती आणि म्हणूनच याचिकाकर्त्यांनी ३४ स्वतंत्र नोंदणीकृत खरेदी खते निष्पादित केली आणि मेसर्स

राज दरबार मटेरियल ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेडकडून प्राप्त झालेल्या रकमेचा परतावा दिल्यानंतर धनाकर्ष (DD) किंवा आरटीजीएस (RTGS )द्वारे प्रत्येक संस्थेकडून संबंधित रकमा स्वतंत्रपणे प्राप्त झाल्या. या व्यवहारांमध्ये, याचिकाकर्त्यांनी आरोप केल्याप्रमाणे १५० कोटी रुपये नव्हे तर ७६.७२ कोटींच्या विक्रीचा व्यवहार झाला होता.

१३. श्री. होरा पुढे म्हणाले की, याचिकाकर्त्यांनी यूको बँक, आयडीबीआय आणि डीएचएफएल या बँकांकडून वैध ना हरकत प्रमाणपत्र मिळवल्यानंतर व्यावसायिक गाळे विकल्या होत्या आणि त्यास कोणत्याही बँकेने याचिकाकर्त्यांविरोधात कोणतीही तक्रार केली नाही, कारण याचिकाकर्त्यांनी त्यात नमूद केलेल्या व्यावसायिक पेढ्यांच्या संदर्भात सर्व थकबाकी निरंक केली होती. त्यांनी पुढे सांगितले की, याचिकाकर्ते-अनूप बरतारिया हे एक प्रसिद्ध वास्तुविशारद असल्याने त्यांनी श्री. भारत बंब यांना, त्यांच्या उदयपूर येथील रॉयल राज व्हिला प्रकल्पासाठी स्थापत्य सेवा पुरविल्या होत्या आणि श्री. बंब यांच्याकडून मिळालेल्या शुल्काची रक्कम याचिकाकर्त्यांच्या आयकर आणि सेवा कर विवरणपत्रात देखील दिसून येते.

१४. श्री. होरा यांच्या मते, पीएमएलए (PMLA ) अंतर्गत कथित गुन्हे हे दखलपात्र गुन्हे नाहीत आणि प्रवर्तन निदेशलाय (ED )ने केलेला संपूर्ण तपास कायद्याच्या कोणत्याही अधिकाराशिवाय होता.शेवटी, त्यांनी सादर केले की श्री. भारत बंब यांच्याशी कोणताही संबंध नसलेल्या याचिकाकर्त्यांना विश्वासार्हता आणि व्यावसायिक नुकसान सहन करावे लागत आहे आणि म्हणूनच पेप्सी फूड्स लिमिटेड विरुद्ध विशेष न्यायिक दंडाधिकारी या प्रकरणातील या न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने सदर तक्रार रद्द करण्यास पात्र आहे.

१५. दुसरीकडे ,प्रतिवादींची बाजू मांडणाऱ्या विद्वान अतिरिक्त महान्यायाधिकर्ता यांनी जोरदारपणे सांगितले की, याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयासमोर क्षुल्लक याचिका दाखल केल्या आहेत, ज्या उच्च न्यायालयाने खर्चाच्या आदेशासह फेटाळल्या आहेत, ज्या आदेशात न्याय्य आणि योग्य असल्याने या न्यायालयाने त्यात हस्तक्षेप करू नये.हरियाणा राज्य वि. भजनलाल या प्रकरणांवर भर देऊन त्यांनी असे सादर केले की तक्रार रद्द करण्याचा अधिकार केवळ दुर्मिळ प्रकरणांमध्येच वापरला जाऊ शकतो जेथे दर्शनी मूल्यावर घेतलेले आरोप प्रथमदर्शनी कोणताही गुन्हा ठरत नाहीत. सदर प्रकरणात, याचिकाकर्त्यांविरुद्ध धनशोधनाचे(MONEY LAUNDERING) चे विशिष्ट आरोप आहेत जे PMLA अंतर्गत अधिकृत अधिकारी यांनी केलेल्या तपासादरम्यान समोर आले होते, जे प्रथमदर्शनी याचिकाकर्त्यांविरुद्ध उक्त कायद्यांतर्गत गुन्हा ठरतात.

१६. अंमलबजावणी संचालनालय (ED) ने दाखल केलेल्या फिर्यादी तक्रारीवर भर देत, विद्वान अतिरिक्त महान्यायाधिकर्ता यांनी असे निदर्शनास आणून दिले की याचिकाकर्ते-अनूप बारतारिया यांनी वर्ल्ड ट्रेड पार्कमध्ये त्याच्या नावाने तीन कार्यालये खरेदी करण्याच्या नावाखाली सिंडिकेट बँकेकडून ४.८० कोटी रुपयांचे फसवे कर्ज घेतले होते, ज्यासाठी सिंडिकेट बँकेने २३/०३/२०१७ रोजी सी. बी. आय.(CBI) कडे प्रथम खबरी अहवाल दाखल केला होता.श्री. भारत बंब आणि त्याच्या साथीदारांच्या नियंत्रणाखाली असलेल्या काल्पनिक कंपन्यांकडून पैसे मिळवून सदर मुदत कर्जाचा १.५० कोटी रुपयांचा हप्ता भरण्यात येत असल्याचेही उघड झाले आहे. त्यांनी याकडेही लक्ष वेधले की, याचिकाकर्ते-अनूप बरतारिया यांनी सिंडिकेट बँकेत ३०/०९/२०१४ रोजी उघडलेले चालू बँक खाते हे केवळ श्री. भारत बंब यांच्याकडून कलंकित पैसे मिळवण्यासाठी

चालवले जात होते आणि त्या खात्यात इतर कोणतेही व्यवहार झाले नव्हते, मूल्यांकन वर्ष २०१५-२०१६ साठी दाखल केलेल्या अनूप बर्तारिया यांच्या आय कर परताव्यामध्येही सदर खाते जाहीर करण्यात आले नव्हते.

१७. त्यांनी सादर केले की याचिकाकर्ते-अनूप बरतारिया आणि त्यांच्या कंपनीने वर्ल्ड ट्रेड पार्कच्या प्रकल्पासाठी आयडीबीआय बँक/डीएचएफएल आणि यूको बँकेकडून कर्ज घेतले होते आणि त्याकरिता ह्या प्रकल्पातील व्यावसायिक पेढ्या बँकांना गहाण ठेवल्या होत्या.मंजुरीच्या अटींच्या अनुषंगाने, वर्ल्ड ट्रेड पार्क लिमिटेडने आयडीबीआय बँकेत एस्क्रो खाते (ESCROW ACCOUNT) उघडले होते, ज्यामध्ये विक्रीतून मिळणारी सर्व रक्कम केवळ त्याच खात्यात जमा करायची होती.तथापि, श्री. बर्तारिया यांनी या एस्क्रो खात्यात (ESCROW ACCOUNT) कोणतीही रक्कम जमा केली नाही आणि श्री. भारत बंब आणि त्यांच्या सहकाऱ्यांना सिंडिकेट बँकेत खाते उघडून कलंकित पैसा ठेवण्यास मदत केली.आयडीबीआयला कार्यालय क्रमांक ४०७, ४०८ आणि ४०९ संदर्भात ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यासाठीच्या विनंती पत्रांमध्ये, ग्राहक म्हणून मेसर्स राज दरबार मटेरियल लि. असे नाव दर्शविलेले असून त्यामध्ये विक्री न झालेल्या मालमत्तेची स्थिती दर्शविली आहे.

१८. विद्वान अतिरिक्त महान्यायाधिकर्ता यांनी त्यांच्या निवेदनाच्या समर्थनार्थ उलट प्रतिज्ञापत्रावर भर दिला की, भारत बंब आणि त्याच्या सहकाऱ्यांनी तयार केलेल्या आणि चालवलेल्या बनावट पेढ्या /कंपन्यांच्या खात्यांमधून फसवणूक उघडकीस येईपर्यंत, याचिकाकर्ते-अनूप बरतारिया, एम/एस. वर्ल्ड ट्रेड पार्क लिमिटेड ही कंपनी, जी पूर्वी एम/एस. आर. एफ. ट्रेडिंग अँड प्रॉपर्टीज म्हणून ओळखली जात होती, आणि एम/एस.

सिन्सियर इन्फ्रा स्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांना ऑक्टोबर २०१३ पासून १६० कोटींहून अधिक फसवणूक झालेला निधी मिळाला होता

१९. विद्वान अतिरिक्त महान्यायअधिकर्ता यांनी अंमलबजावणी संचालनालय (ED) ने दाखल केलेल्या फिर्यादीच्या तक्रारीमधील, विशेषतः परिच्छेद क्रमांक १०.५ आणि १०. ८वर विशेष भर दिला आहे ज्यात याचिकाकर्ते-अनूप बरतारिया हे गुन्ह्यात कसे सहभागी होते आणि भारत बंब यांच्या समवेत गुन्ह्याच्या फळामध्ये वाटणीदार होते हे दाखविले आणि गुन्हेगारीच्या उत्पन्नाशी संबंधित क्रियाकलापांमध्ये ते कसे थेट सहभागी होते , ज्यात अनुसूचित गुन्हेगारीद्वारे गुन्हेगारीच्या उत्पन्नाची निर्मिती, संपादन आणि वापर यांचा समावेश आहे.

२०. वित्त अधिनियम (क्रमांक २) २०१९ द्वारे विशिष्ट हेतू प्रित्यर्थ समाविष्ट केलेल्या तरतुदीच्या स्पष्टीकरणासह वाचलेल्या कलम ४५ मधील तरतुदी बाबत त्यांनी असे सादर केले की, पीएमएलए (PMLA) अंतर्गत असलेले गुन्हे "दखलपात्र आणि अजामीनपात्र" आहेत. विद्वान अतिरिक्त महान्याय अधिकर्ता यांनी शेवटी सादर केले की याचिकाकर्त्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई न करण्याचे प्रतिवादींना निर्देश देणाऱ्या २५/०३/२०१९ रोजी या न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे, सक्षम न्यायालयासमोरची कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे आणि तपासही थांबला आहे, ज्यामुळे पीएमएलए (PMLA) अंतर्गत अंमलबजावणी संचालनालय (ED) ने दाखल केलेल्या प्रकरणात मोठा पूर्वग्रह निर्माण झाला आहे.

२१. आता, पी. एम. एल. ए.(PMLA) अंतर्गत धनशोधनाचे (Money Laundering) गुन्हे दखलपात्र आहेत की नाही याबाबत उपस्थित करण्यात आलेल्या पहिल्या आणि सर्वात महत्त्वाच्या वादाकडे वळून, हे लक्षात घेतले जाऊ शकते की गुन्ह्यांशी संबंधित कलम ४५ च्या उपकलम (१) मध्ये २००५ च्या कायदा २० द्वारे सुधारणा करण्यात आली होती. दुरुस्तीपूर्वी कलम ४५ मधील उपकलम १ खालीलप्रमाणे वाचण्यात यावे :

**"कलम ४५-गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र असतील -**

१) दंड प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ मधील २) मध्ये काहीही समाविष्ट असले तरी,

(अ) या कायद्यांतर्गत दंडनीय असलेला प्रत्येक गुन्हा दखलपात्र असेल;

(ब) अनुसूचीच्या भाग अ अंतर्गत तीन वर्षांपेक्षा जास्त कारावासाची शिक्षा झालेल्या गुन्ह्याचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीची जामिनावर किंवा त्याच्या जातमुचलक्यावर सुटका केली जाणार नाही. "

२२. त्यानंतर, १/७/२००५ पासून २००५ च्या अधिनियम २० द्वारे पोट-कलम (१) बदलण्यात आले.

(१) दंड प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही समाविष्ट असले तरी, [या कायद्यांतर्गत] गुन्ह्याचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीची जामिनावर किंवा त्याच्या जातमुचलक्यावर सुटका केली जाणार नाही.

२३. हे लक्षात घेतले पाहिजे की शंका निरसन करण्यासाठी, कलम ४५ चे स्पष्टीकरण वित्त (क्रमांक 2) अधिनियम, २०१९ द्वारे १/८/२०१९ पासून लागू केले गेले होते जे खालीलप्रमाणे आहे:

स्पष्टीकरण-शंका निरसन करण्यासाठी, हे स्पष्ट केले जाते की "गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र आहेत" या अभिव्यक्तीचा अर्थ असा असा होईल आणि नेहमीच असा समजला जाईल की

> या कायद्यांतर्गत केलेले सर्व गुन्हे दंड प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये याउलट काहीही समाविष्ट असले तरी तरी "गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र" असतील आणि त्यानुसार या कायद्यांतर्गत अधिकृत अधिकार्यांना कलम १९ अंतर्गत अटींची पूर्तता आणि या कलमांतर्गत नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून अधिपत्राशिवाय आरोपीला अटक करण्याचा अधिकार आहे.

२४. उप कलम (१) मधील बदल आणि कलम ४५ मध्ये समाविष्ट केलेले स्पष्टीकरण आणि कलम ४५ च्या लघू शीर्षकात सुधारणा न करून -"दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हे", यापासून, दंड प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये याउलट काहीही समाविष्ट असले तरी, पी. एम. एल. ए.(PMLA) अंतर्गतचे सर्व गुन्हे "दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हे" होते, आहेत आणि असतील यात कोणतीही शंका नाही. त्यानुसार, पीएमएलए (PMLA) कायद्यांतर्गत अधिकृत अधिकाऱ्यांना कलम १९ अंतर्गत अटींच्या पूर्ततेच्या अधीन जे अटक करण्याच्या अधिकाराशी संबंधित आहे आणि कलम ४५ अंतर्गत समाविष्ट केलेल्या अटींच्या अधीन राहून अधिपत्राशिवाय आरोपीला अटक करण्याचा अधिकार आहे .ईसीआयआर क्र. JPZO/०१/२०१६ मधील फिर्यादी तक्रार क्रमांक १२/२०१८ ही कलम ४५ अंतर्गत भारत सरकार, अर्थ मंत्रालय, महसूल विभाग, नवी दिल्ली यांनी जारी केलेल्या ११/११/२०१४ तारखेच्या आदेशासह तक्रार दाखल करण्यास सक्षम असलेल्या अधिकृत अधिकाऱ्याने दाखल केलेली असल्याने, तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, श्री. होरा यांनी केलेल्या निवेदनामध्ये न्यायालयाला कोणतेही तथ्य आढळत नाही की फिर्यादी तक्रार ही अधिकृत अधिकाऱ्याने दाखल केलेली नाही.

२५. याचिकाकर्त्यांचे विद्वान वकील श्री होरा यांनी सादर केलेल्या निवेदनानुसार याचिकाकर्त्यांस ज्ञात असणे की ते गुन्ह्याच्या कमाईशी व्यवहार करत आहेत हे PMLA

च्या कलम ३ नुसार केलेल्या व्याख्येनुसार धनशोधनाच्या (Money Laundering) गुन्ह्यासाठी अनिवार्य आणि आवश्यक घटक आहे आणि सदरच्या प्रकरणात, याचिकाकर्त्यांना ते भारत बंब आणि त्याच्या सहकाऱ्यांनी केलेल्या गुन्ह्यातून मिळालेल्या रकमेशी व्यवहार करत असल्याची माहिती आहे हे दाखवण्यासाठी कोणतीही सामग्री नसताना, याचिकाकर्त्यांविरुद्ध धनशोधन अधिनियम(PMLA) अंतर्गत कार्यवाही सुरू ठेवणे हा कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर ठरेल, त्यास तसा ठोस आधार देखील नाही. हे लक्षात घेतले जाऊ शकते की धनशोधन अधिनियम(PMLA) कायद्याच्या कलम ३ मध्ये आर्थिक गैरव्यवहाराच्या गुन्ह्याची व्याख्या करण्यात आली आहे, जी खालीलप्रमाणे आहेः

> "**३. आर्थिक गैरव्यवहाराचे (Money Laundering ) गुन्हे** : - जो कोणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी होण्याचा प्रयत्न करतो किंवा जाणीवपूर्वक मदत करतो किंवा जाणीवपूर्वक पक्षकार आहे किंवा प्रत्यक्षातील कोणत्याही प्रक्रिया किंवा कृत्यात गुंतलेला आहे [गुन्ह्याची कमाई, ज्यात ती लपवणे, ताब्यात घेणे, संपादन करणे किंवा त्याचा वापर करणे किंवा दावा करणे समाविष्ट आहे], तो आर्थिक गैरव्यवहाराच्या (Money Laundering ) गुन्ह्यासाठी दोषी ठरेल.

[स्पष्टीकरण.-शंका निरसन करण्यासाठी याद्वारे हे स्पष्ट केले जाते की, -

> (१) एखादी व्यक्ती खालील प्रक्रिया किंवा कृत्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे गुंतलेली आढळल्यास किंवा जाणीवपूर्वक मदत करत असल्यास किंवा जाणीवपूर्वक पक्षकार असल्यास किंवा गुन्ह्याच्या उत्पन्नाशी संबंधित खालीलपैकी एक किंवा अधिक प्रक्रिया किंवा उपक्रमांमध्ये प्रत्यक्षात सहभागी असल्यास, ती व्यक्ती आर्थिक गैरव्यवहाराच्या (Money Laundering ) दोषी ठरेल, ती म्हणजेः- असे.
>
> (क ) लपवणे; किंवा
>
> (ख) स्वामित्व; किंवा
>
> (ग) अधिग्रहण; किंवा

(घ) उपयोग; किंवा

(ङ) कलंकित मालमत्ता म्हणून प्रक्षेपित करणे; किंवा

(च) कोणत्याही प्रकारे कलंकित  मालमत्ता म्हणून दावा करणे;

(2) गुन्ह्याच्या उत्पन्नाशी संबंधित प्रक्रिया किंवा कृत्य हा एक निरंतर क्रियाकलाप आहे आणि जोपर्यंत एखादी व्यक्ती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे गुन्ह्याच्या प्राप्तीचा उपभोग घेत नाही, ती लपवून किंवा ताब्यात घेऊन किंवा संपादन करून किंवा त्याचा वापर करून किंवा ती कलंकित  मालमत्ता म्हणून सादर करून किंवा कोणत्याही प्रकारे कलंकित  मालमत्ता म्हणून दावा करत नाही तोपर्यंत चालू राहते.] "

२६. कलम २ (यू) "गुन्ह्यातील  प्राप्ती" म्हणजे काय हे परिभाषित करते आणि कलम २ (वाय) "अनुसूचित गुन्हा" म्हणजे काय हे परिभाषित करते. अभिलेखावरून हे स्पष्ट होते की, गुन्हे अन्वेषण विभागाने (CBI) प्रथम खबरी अहवाल क्रमांक RCBD१/२०१६/E/०००२ दिनांक ०७/०३/२०१६ मधील केलेल्या तपासाच्या अनुषंगाने अंमलबजावणी संचालनालय (ED) यांनी आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्यान्वये ECIR मध्ये फिर्यादी तक्रक दाखल केली होती आणि भारत बंब  आणि इतरांविरुद्ध गुन्हे अन्वेषण विभागाने भारतीय दंड संहितेच्या  कलम १२०(ख), ४२०,४६७,४६८,४७१,४७२ आणि ४७४ आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ च्या कलम १३ (२) सह  कलम १३ (१) (घ)  अंतर्गत जयपूर येथील नियुक्त सी. बी. आय. (CBI) न्यायालयात दिनांक १४/०६/२०१६ रोजी आरोपपत्र दाखल केले. उपरोक्त नमूद सर्व गुन्हे सदर कायद्याच्या कलम २(वाय) मधील अर्थानुसार अनुसूचित गुन्हे आहेत. याचिकाकर्ते  क्र. १-अनूप बरतारिया  (आरोपी क्रमांक ५) मे. वर्ल्ड ट्रेड पार्क लि. चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक आणि याचिकाकर्ते क्र. २- वर्ल्ड ट्रेड पार्क लि. (आरोपी क्रमांक ८) यांच्यावर

केलेले आरोप हे फिर्यादीच्या तक्रारीत अनुक्रमे परिच्छेद १०. ५ आणि १०. ८मध्ये तपशीलवार नमूद केले आहे.या टप्प्यावर न्यायालयाला या आरोपांच्या गुणवत्तेबाबत जाणण्याची आवश्यकता नाही.असे म्हणणे पुरेसे आहे की फिर्यादी तक्रारीत दोन्ही याचिकाकर्त्यांवर आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप लावण्यात आले आहेत आणि या आरोपांना पुष्टी देण्यासाठी या तक्रारीत पुरेशा सामग्रीचे वर्णन केले गेले आहे, जे प्रथमदर्शनी आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ मध्ये परिभाषित केल्यानुसार कथित गुन्ह्यामध्ये याचिकाकर्त्यांचा थेट सहभाग दर्शवते.

२७. कलम ३ मधील व्याख्येचा विचार करता, असे म्हणणे असमंजस पणाचे ठरेल की आरोपीला तो गुन्ह्यातील संपत्तीशी व्यवहार करीत असल्याचे माहित असणे ही एक पूर्वअट असेल किंवा या कायद्यांतर्गत तक्रार दाखल करण्यासाठी अभियोगाद्वारे दर्शविण्याची आवश्यकता नाही. व्याख्या स्वतःच सुचवते की जो कोणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे गुंतवण्याचा प्रयत्न करतो किंवा ज्ञातपणे मदत करतो किंवा ज्ञातपणे पक्षकार आहे किंवा गुन्ह्यातील संपत्तीशी संबंधित कोणत्याही प्रक्रिया किंवा कृत्यात गुंतलेला आहे, ज्यात त्याचा लपवणे, ताबा, संपादन किंवा वापर आणि ती अबाधित मालमत्ता म्हणून सादर करणे किंवा दावा करणे समाविष्ट आहे, तो आर्थिक गैरव्यवहाराच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरेल. त्यामुळे, ज्ञात असण्याव्यतिरिक्त, जर एखादी व्यक्ती जी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे गुन्ह्यातील संपत्तीशी संबंधित प्रसंभाविक प्रक्रिया किंवा कृत्यात गुंतलेली असेल किंवा प्रत्यक्षात गुंतलेली असेल, तर ती देखील आर्थिक गैरव्यवहाराच्या गुन्ह्यासाठी दोषी आहे. सदरच्या प्रकरणात, तक्रारीत वर्णन केलेल्या सामग्रीसह, गुन्ह्यातील संपत्तीशी संबंधित

क्रियाकलापांमध्ये याचिकाकर्त्यांचा थेट सहभाग असल्याचा आरोप करण्यात आला आहे ज्यासाठी सक्षम न्यायालयाद्वारे संपरीक्षा चालवणे आवश्यक आहे.

२८. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अन्वये तक्रार रद्द करण्याच्या अधिकाराचा वापर अतिशय कमी प्रमाणात आणि सावधगिरीने केला पाहिजे आणि तो देखील दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरणांमध्ये. हरियाणा राज्य विरुद्ध भजनलाल (उपरोक्त) या प्रकरणात, कलम ४८२ अंतर्गत असलेल्या अधिकारांचा वापर कोणत्याही न्यायालयाच्या प्रसंभाविक प्रक्रियेचा गैरवापर रोखण्यासाठी किंवा न्यायाची मागणी सुरक्षित करण्यासाठी कधी केला जाऊ शकतो याबद्दल या न्यायालयाने काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत.

> "१०२. चौदाव्या प्रकरणांतर्गत संहितेच्या विविध संबंधित तरतुदींच्या व्याख्येच्या पार्श्वभूमीवर आणि कलम २२६ अंतर्गत असाधारण अधिकाराच्या वापराशी संबंधित निर्णयांच्या मालिकेत या न्यायालयाने किंवा संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत अंगभूत शक्तींशी संबंधित निर्णयांच्या पार्श्वभूमीवर, ज्या आम्ही स्पष्ट केल्या आणि पुनरुत्पादित केल्या आहेत, आम्ही उदाहरणाद्वारे प्रकरणांची खालील श्रेणी देतो ज्यामध्ये अशा अधिकाराचा वापर एकतर कोणत्याही न्यायालयाच्या प्रसंभाविक प्रक्रियेचा गैरवापर रोखण्यासाठी किंवा न्यायाची मागणी सुरक्षित करण्यासाठी केला जाऊ शकतो, जरी कोणतीही अचूक, स्पष्टपणे परिभाषित आणि प्रामाणिकपणे निर्देशित आणि लवचिक मार्गदर्शक तत्त्वे किंवा कठोर सूत्रे मांडणे आणि अशा प्रकारच्या असंख्य प्रकरणांची संपूर्ण यादी देणे शक्य नसले तरी ज्यात अशा अधिकाराचा वापर करण्यात यावा.
>
> (1) प्रथम खबरी अहवालात किंवा तक्रारीत केलेले आरोप, जरी ते त्यांच्या दर्शनी मूल्यावर घेतले गेले असले आणि ते पूर्णपणे स्वीकारले गेले असले तरी सकृतदर्शनी कोणताही गुन्हा ठरत नाही किंवा आरोपींविरुद्ध खटला दाखल होत नाही.

(२) प्रथम माहिती अहवालातील आरोप आणि प्रथम खबरी अहवाला सोबत असलेले इतर साहित्य असल्यास, त्यात दखलपात्र गुन्हा उघड होत नसेल, तर संहितेच्या कलम १५५(२) च्या कक्षेत असलेल्या दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाखेरीज संहितेच्या कलम १५६(१) अन्वये पोलिस अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासाचे समर्थन होते.

(३) जेथे प्रथम खबरी अहवाल किंवा तक्रारीमध्ये केलेले निर्विवाद आरोप आणि त्याच्या समर्थनार्थ गोळा केलेले पुरावे कोणत्याही गुन्ह्याचा खुलासा करत नाहीत आणि आरोपीविरुद्ध खटला दाखल करत नाहीत.

(४) प्रथम खबरी अहवाला मधील आरोप हा दखलपात्र गुन्हा नसून केवळ अदखलपात्र गुन्हा असेल, तर संहितेच्या कलम १५५(२) अन्वये विचार केल्याप्रमाणे दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय पोलिस अधिकाऱ्याला तपास करण्याची परवानगी नाही.

(५) जिथे प्रथम खबरी अहवाल किंवा तक्रारीमध्ये केलेले आरोप इतके असंगत आणि स्वाभाविकपणे असंभाव्य आहेत की ज्याच्या आधारावर कोणताही विवेकी व्यक्ती कधीही ह्या न्याय्य निष्कर्षापर्यंत पोहोचू शकत नाही की, आरोपींविरुद्ध कारवाई करण्यासाठी त्या योग्य आधार असतील.

(६) जेथे संहिता किंवा संबंधित कायद्याच्या कोणत्याही तरतुदींमध्ये (ज्याच्या अंतर्गत फौजदारी कारवाई सुरू केली जाते) दाखल होण्यास आणि कार्यवाही सुरू ठेवण्यास आणि/किंवा जेथे संहिता किंवा संबंधित कायद्यात विशिष्ट तरतूद आहे, तेथे बाधित पक्षाच्या तक्रारीचे प्रभावी निवारण करण्यासाठी स्पष्ट कायदेशीर अडथळा आहे.

(७) जिथे फौजदारी कार्यवाही उघडपणे दुर्भावनापूर्णपणे हाताळली जात असेल आणि/किंवा आरोपीचा सूड उगवण्याच्या हेतुने आणि खाजगी आणि वैयक्तिक द्वेषामुळे त्याचा तिरस्कार करण्याच्या हेतूने ही कारवाई द्वेषपूर्णपणे सुरू केली जाते. "

२९. याचिकाकर्त्यांचे प्रकरण वरीलपैकी कोणत्याही श्रेणीत येत नाही. प्रतिवादी अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर केल्याचे कोणतेही प्रकरण मांडण्यातही याचिकाकर्ते अपयशी ठरले आहेत. धनशोधन कायद्या अंतर्गत विचार केल्याप्रमाणे, आर्थिक गैरव्यवहाराच्या कथित गुन्ह्यात याचिकाकर्त्यांचा सकृतदर्शनी सहभाग दर्शविणारे पुरेसे साहित्य असल्याने उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या याचिका योग्यरित्या फेटाळल्या होत्या. कायद्याच्या उद्दिष्ट आणि कारणांच्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, आर्थिक गैरव्यवहारामुळे केवळ देशांच्या आर्थिक व्यवस्थेसाठीच नव्हे तर त्यांच्या अखंडतेसाठी आणि सार्वभौमत्वासाठीही गंभीर धोका निर्माण झाला आहे.त्यामुळे अशा गुन्ह्यांबाबत कोणताही उदार दृष्टीकोन बाळगणे हा न्यायाचा उपहास ठरेल.

३०. तत्पूर्वी, हे लक्षात घेतले पाहिजे की, विशेष अनुमती याचिका (SLP) मधील याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयाने दिनांक २१/००/२०१९ रोजी दिलेला आक्षेपित निकाल आणि आदेश रद्द करण्याच्या मुख्य दिलाश्यासाठी प्रार्थना करताना, ECIR क्रमांक JPZO/०१/२०१६ मधील फिर्यादी तक्रार क्र. १२/२०१८ जी विशेष न्यायाधीश (PMLA प्रकरणे) जयपूर यांच्यासमोर प्रलंबित असून उक्त तक्रारीसह विशेष अनुमती याचिकेचे पेपर बुक सादर न करता संपूर्ण कार्यवाहीला स्थगिती देण्यासाठी अंतरिम दिलासा मागितला होता. ८ मार्च, २०१९ रोजी सर्व दोष दूर केल्याचे घोषित करून विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्यात आल्याचे दिसते आणि त्यानंतर २५/०३/२०१९ रोजी, अतिरिक्त कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मागणाऱ्या अर्जाद्वारे, याचिकाकर्त्यांनी फिर्यादी तक्रार क्र. १२/२०१८ अभिलेखावर आणली. विशेष अनुमती याचिका दाखल

केल्यानंतर, न्यायालयाच्या परवानगीशिवाय कोणतेही दस्तऐवज दाखल केले जाऊ शकले नसते, जे प्रस्तुत प्रकरणात याचिकाकर्त्यांनी मागितले असल्याचे दिसत नाही किंवा न्यायालयाने मंजूर केलेले दिसत नाही, याशिवाय आवश्यक आणि संबंधित कागदपत्रे विशेषतः ज्या कागदपत्रांच्या आधारे विशेष अनुमती याचिकेमध्ये दिलासा मागितला जातो ती दाखल न करण्याच्या प्रथेस जोरदारपणे नापसंत केले जाते. हे लक्षात घेतले जाऊ शकते की विशेष अनुमती याचिके सह संबंधित कागदपत्रे, विशेषतः ज्या कागदपत्रांच्या आधारे दिलाश्याची मागणी केली आहे, ते सादर न करणे हे विशेष अनुमती याचिका फेटाळणेठी एकमेव आधार असू शकते.

३१. विशेष अनुमती याचिकेच्या नोंदणीच्या वेळी सर्व संबंधित कागदपत्रे, विशेषतः ज्या कागदपत्रांच्या आधारे दिलाश्याची मागणी केली आहे, ती विशेष अनुमती याचिके सह याचिकाकर्त्यांनी प्रथमदर्शनी सादर केली आहेत की नाही याची पडताळणी करण्याचे निर्देशही प्रबंधनास देण्यात आले आहेत.

३२. या प्रकरणाच्या दृष्टीने याचिका फेटाळल्या जातात. यापूर्वी देण्यात आलेला अंतरिम दिलाशाचा तातडीने विलोप करण्यात येत आहे.हे सांगण्याची गरज नाही की या आदेशात याचिकाकर्त्यांविरुद्ध केलेली निरीक्षणे केवळ सकृतदर्शनी आहेत आणि संपरीक्षा न्यायालये या निरीक्षणांनी प्रभावित न होता गुणवत्तेच्या आधारे या प्रकरणाचा निर्णय घेतील .

३३. प्रतिवादींचे विद्वान वकील, निर्देशांनुसार, या न्यायालयाला कळवले की तपास संपला असून आरोपपत्र दाखल झाले आहे, त्यामुळे याचिकाकर्त्याच्या कोठडीतील पुसतपासची आवश्यकता नाही.

३४. अंमलबजावणी संचालनालयाला कायद्यानुसार फिर्यादी तक्रारीसह पुढील कार्यवाही करण्याचे स्वातंत्र्य असेल.

३५. या न्याय निर्णयाची एक प्रत सरचिटणीस आणि कुलसचिव (जे. आय.) यांना आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी पाठवावी.

---

1 (2018) 11 S.C.C 1
2 (1998) 5 S.C.C 749
3 1992 SUPP (1)S.C.C. 335

*****

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याची कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

*****